PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दि. २६.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

# पार्लेमहोत्सवात स्पर्धा व जनजागृती यांचा सुमेळ

मुंबई : सध्या सुरू असलेल्या १५व्या पार्लेमहोत्सवात पाचव्या व सहाव्या दिवशी रांगोळी, स्वरचित काव्यवाचन, पथनाट्य, 'भारत को जानो' प्रश्नमंजुषा आदी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या सर्व स्पर्धांतून कलाकारांनी सामाजिक समस्यांना वाचा फोडली. हा पार्लेमहोत्सव फक्त कला आणि क्रिडा यांचेच व्यासपीठ नसून विविध स्पर्धांतून सामाजिक विषयांनाही स्पर्श केला जातो. त्यामुळे सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून जनजागृती करण्याचेही हे व्यासपीठ आहे. यावर्षी अनेक ज्वलंत प्रश्न विविध माध्यमांतून रसिकांसमोर सादर केले गेले याचे मला समाधान आहे, असे या महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी सांगितले.

पार्लेमहोत्सवात स्पर्धकांच्या मागणीनुसार दरवर्षी अनेक नवीन उपक्रम राबविले जातात. नवीन खेळांचा समावेश केला जातो. यावर्षी तर प्रत्येक दिवशी एका नवीन कला-क्रिडा प्रकाराचा यात समावेश केला आहे. त्यानुसार महोत्सवाच्या सहाव्या दिवशी पथनाट्य स्पर्धेचा नव्याने समावेश केला गेला. पहिल्याच वर्षी महाराष्ट्रभरातून ५०हून अधिक संघ यात सहभागी झाले होते. या पथनाट्यांतून अनेक ज्वलंत सामाजिक विषयांवर कलेच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकला गेला आणि उपायही सूचविला गेले. स्वरचित काव्यवाचन स्पर्धेतदेखील २००हून अधिक नवोदित कवींनी आपली कलाकृती सादर केली. विशेष म्हणजे काही बालक स्पर्धक तर आपल्या आईवडिलांच्या कडेवरून आपल्या आयुष्यातील पहिल्यावहिल्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आले होते. हे दृश्य तर विलोभनीय होते.

या महोत्सवातील अनेक महत्त्वाच्या स्पर्धा येत्या तीन-चार दिवसात पार पडणार आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस स्पर्धक आणि प्रेक्षक स्पर्धेच्या ठिकाणी गर्दी करीत आहेत.

१५व्या पार्लेमहोत्सवाच्या अधिक माहितीसाठी भाजपा कार्यालय, चित्तरंजन मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे किंवा २६१७७१२५ अथवा २६१३६५१३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. www.parlemahotsav.com या संकेतस्थळावर आणि फेसबूक पेजवरूनही या महोत्सवाची माहिती घेता येईल.

---

हे पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.